# भाईंदर पोलीस ठाणे

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय

मिरा भाईंदर महानगरपालीका जुने कार्यालय शेजारी, स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम, ता.जिल्हा - ठाणे, पिनकोड-४०११०१

Mob. 8655727604, pi.bhayandar.mb-vv@mahapolice.gov.in


जावक क्रमांक - अ.मृ./तपास यादी/९५६८६ /२०२५, मिरा - भाईंदर दिनांक ०१/१२/२०२५

प्रति,

## तपास यादी

मा. सर्व वृत्त संपादक, केबल नेटवर्क
भाईंदर(प.), ता.जि. ठाणे

मुख्य कार्यालय, ...
आ. क्र. ......
दाखल ता. ०३१.१२.२०२५ ......

रिपोर्ट :- आनंदराव काळे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक भाईंदर पोलीस ठाणे

विषय :- अकस्मात मृत्यु मधील अनोळखी बेवारस इसमाच्या नातेवाईकांचा शोध होणेबाबत.

महोदय,

| | | |
|---|---|---|
| १) | अ.मृ.रजि.नं. व कलम | ६८/२०२५ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १९४ प्रमाणे |
| २) | खबर देणाऱ्याचे नाव | पोहवा/०६३२५ संजय मगोंड पाटील, वय-४८ वर्षे, नेमणुक - भाईंदर पोलीस ठाणे, मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय, मोबा-८३०८८१८१३० |
| ३) | अ.मृ. घडला दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक ०२/०८/२०२५ रोजी सकाळी ०९.०० वाजता भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (शताब्दी रुग्णालय), म.न.पा. सर्वसाधारण रुग्णालय कांदिवली (प.), मुंबई, |
| ४) | अ.मृ. दाखल वेळ | दि. १४/०८/२०२५ रोजी २२.५४ वाजता, स्टेशन डायरी नं. ३०/२०२५ |
| ५) | मयताचे नाव व पत्ता | अनोळखी बेवारस इसम वय ४५ वर्षे, रा. नाव पत्ता माहिती नाही. |
| ६) | मयताचे वर्णन | एक बेवारस इसम, पुर्ण नाव पत्ता माहिती नाही, अंदाजे वय-४५ वर्षे, ऊंची सुमारे १६८ सेंमी, रंग-गोरा, डोक्याचे केस वाढलेले, दाढी मिशा राखलेल्या, नाक सरळ, बांधा बारीक, शरीर अशक्त असुन डोक्याच्या पाठीमागील बाजुस जखम झालेली अशा वर्णनाचा |
| ७) |  | हकिकत:- ता.म.वेळी व जागी यातील खबर देणार यांनी खबर दिली की, दिनांक ११/०७/२०२५ रोजी ते पंडित भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय (टेंभा हॉस्पिटल) भाईंदर (प.) येथे एम.एल.सी. डयुटीकामी असताना सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांनी कळविले की, एका अनोळखी इसमास डोक्यात पाठीमागील बाजुस मार लागला असुन त्यास कोणीतरी दवाउपचाराकरीता टेंभा हॉस्पिटल येथे दाखल केले आहे. त्याची कंडीशन क्रिटीकल असून त्यास पुढील उपचाराकरीता शताब्दी हॉस्पिटल, मुंबई येथे दाखल करावे लागेल. असे सांगितल्याने सदर अनोळखी इसमास शताब्दी हॉस्पिटल, मुंबई येथे उपराचारकरीता दाखल केले असताना उपराचारादरम्यान सदर अनोळखी इसम हा दिनांक ०२/०८/२०२५ रोजी सकाळी ०९.०० वाजता मयत झाला म्हणुन खबर. |

वरीलप्रमाणे अ.मृ. दाखल असुन सदर अनोळखी बेवारस मयत इसमाचा फोटो सोबत जोडला आहे. तरी सदर अनोळखी बेवारस मयत इसमाच्या वारसांचा शोध होणेकामी आपले मार्फतीने प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

(आनंदराव काळे)
सहायक पोलीस निरीक्षक
भाईंदर पोलीस ठाणे